# जनसंपर्क अधिकारी

## मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
## रामनगर सृष्टी, मिरारोड (पुर्व) ता.जि.ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१

**Mail ID-** pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक ३२४-२२** **दिनांक ०२/११/२०२२**

## अहमदाबाद, राज्य-गुजरात येथुन अपहरण झालेल्या ०३ अल्पवयीन मुलींचा शोध घेण्यात गुन्हे शाखा, कक्ष- ०१ यांना यश.

दिनांक ३१/१०/२०२२ रोजी दुपारी १४.३० वा.चे दरम्यान कारंज भद्रकाली मंदिर, बँक ऑफ इंडीयाच्या समोर तीन रस्ता अहमदाबाद येथुन फिर्यादी नामे हबीब उस्मान दोधनी, रा. जामनगर, राज्य- गुजरात यांच्या ०३ अल्पवयीन मुली १) वय-१५ वर्षे, २) वय-१४ वर्षे, ३) वय-१२ वर्षे, सर्व रा. जामनगर, राज्य गुजरात याचे अपहरण झालेबाबत तक्रार प्राप्त झाल्याने कारंज पोलीस ठाणे (अहमदाबाद) येथे गु.र.क्र. १११९१०२७२२०५७१/२०२२ भा.द.वि.स. ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दिनांक ०१/११/२०२२ रोजी पोलीस निरिक्षक श्री. व्हि. बी. आल, नेम-गुन्हे शाखा अहमदाबाद, राज्य-गुजरात यांनी गुन्हे शाखा कक्ष-०१, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांना संपर्क करुन कळविले की, सदर गुन्हयातील अपहरित मुली या मिरारोड परिसरात आहेत. त्याअनुषंगाने वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट-०१ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास करुन सदर मुलींचा शोध घेतला असता गुन्हयातील अपहरित मुली हया भारती पार्क, मिरारोड रेल्वे स्टेशन परिसर या ठिकाणी दि. ०२/११/२०२२ रोजी मिळुन आल्या. त्यानंतर सदर मुलींना पुढील कार्यवाहीकरीता पोलीस उप निरीक्षक एम. एन. जडेजा, क्राईम ब्रँच, अहमदाबाद, राज्य गुजरात व तपास टिम यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय, अति. कार्यभार (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा कक्ष-०१ चे पो.निरी. श्री. अविराज कुराडे, सहा.पो.निरी. पुष्पराज सुर्वे, पो.उप.निरी. हितेंद्र विचारे, सहा.फौज. राजु तांबे, संदिप शिंदे, संजय पाटील, पो.हवा. पुष्पेंद्र थापा, अविनाश गर्जे, संतोष लांडगे, संजय शिंदे , विकास राजपुत, प्रफुल पाटील यांनी पार पाडली आहे.

......ooooo......